# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३५४-२२** **दिनांक २५/११/२०२२**

## पोलीस उप आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नयानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंधर्व ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई.

दिनांक २४.११.२०२२ रोजी श्री. जयंत बजबळे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मिरारोड यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, नयानगर पोलीस ठाणे हद्दीत जुन्या पेट्रोल पंपाजवळ, मिरारोड येथील गंधर्व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनेत महिला सिंगर हया तोकडे व उत्तान कपडे परिधान करुन अर्धवट अंग उघडे ठेवुन गि-हाईकांशी बिभत्स व अश्लिल नृत्य अंगविक्षेप करीत आहे व सदर कृत्य करण्यास बार मालक, मॅनेजर व ग्राहकही प्रोत्साहन देत आहेत.

मिळालेल्या गोपनीय माहितीच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांनी भाईन्दर पोलीस ठाण्याचे पो.नि. टिळेकर यांना सदर मिळालेल्या माहितीची खातरजमा करुन कायदेशिर कारवाई करण्याबात आदेशित केल्याने पो.नि.टिळेकर यांनी परिमंडळ १ मिरारोड कार्यालयाचे स.पो.नि.लोंढे, नयानगर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, स.पो.नि.प्रणय काटे, जाधव, पो.हवा. शकील पठाण, गुरव यांच्यासह गंधर्व ऑर्केस्ट्रा बार, पत्ता जुन्या पेट्रोल पंपाजवळ, मिरारोड येथे सर्व कायदेशीर बाबीची पुर्तता करुन दि.२४.११.२०२२ रोजी २२.३२ वाजता छापा टाकला असता सदर बार आस्थापनेत महिला सिंगर हया तोकडे व उत्तान कपडे परिधान करुन अर्धवट अंग उघडे ठेवुन बिभत्स व अश्लिल नृत्य अंगविक्षेप करीत असताना व सदर कृत्यास ग्राहकही प्रोत्साहन देत असल्याचे निदर्शनास आले. म्हणून सदरबाबत पंचनामा करुन एकुण ६,४७०/- रु रोख रक्कम जप्त करण्यात आले. पो.हवा.०००२८ शकिल रशिद पठाण यांनी गंधर्व ऑर्केस्ट्रा बारचे मॅनेजर, कॅशिअर, वेटर, सिंगर, ग्राहक यांचेविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन नयानगर पोलीस ठाण्यात गु.र.न. I ८४६/२०२२ भा.दं.वि.सं. कलम २९४, १०९, ११४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड, डॉ. श्री. शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नयानगर पोलीस ठाणे, भाईन्दर पोलीस ठाण्याचे पो.नि.टिळेकर व त्यांचे पथक, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ मिरारोड कार्यालयाचे स.पो.नि.लोंढे व त्यांचे पथक, नयानगर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, स.पो.नि. प्रणय काटे, जाधव, पो.हवा. शकील पठाण, गुरव यांनी पार पाडलेली आहे.

---०००---